लक्ष्मी लॉन्स मंगल कार्यालय
फक्त ५१०००/- रु.
जेवणासह (अटी लागू)
• निसर्गरम्य हवेशिर वातावरण • पाण्याची भरपूर सोय • जेवणासाठी स्वतंत्र हॉल • वधू-वरांना स्वतंत्र रूम्सची सोय • २४ तास लाईटची सोय
श्री स्वामी समर्थ सेवा आश्रम ट्रस्ट
अक्कलकोट-सोलापूर एन.एच.रोड, अक्कलकोट
मो. ९३२६१५८१५१ / ८६२५००५१११

दैनिक सोलापूर
असत्याच्या दुनियेतील सत्य शोधणारे सायं दैनिक
# कटूसत्य
किंमत ५ रुपये
Email - katusatya@gmail.com

विवाहविषयक
सातारा, सांगली, कोल्हापूर मधील मागासवर्गीय वधूसाठी मोफत नाव नोंदणी व परित्यक्ता, विधवा महिलांसाठी नाव नोंदणी चालू आहे.
संपर्क : ८६८९९३४९९६

सोलापूर | RNI No . MAHMAR 2006/17624 | वर्ष १९ वे, अंक ८३ वा | शुक्रवार, दि. १८ ऑक्टोबर २०२४ | पाने ४ | पोष्ट परवाना: - SLP/04/2023-2025 Posted at - R.M.S.Post Office SOLAPUR

# 'वेळ पडली तर मराठे भाजपचा एन्काउंटर करणार'

## मनोज जरांगे पाटील यांचं मोठं वक्तव्य




**जालना (कटूसत्य वृत्त):-** मराठा नेते मनोज जरांगे पाटील यांनी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यावर टीका करताना भाजपला मोठा इशारा दिला. 'वेळ पडली तर मराठे त्यांच्या भाजपचा एन्काउंटर करणार', असं वक्तव्य मनोज जरांगे पाटील यांनी केलं आहे.

'अजून काही ठरले नाही. इच्छुक वाढले आहेत. चर्चा केली. आपल्याला 95 टक्के समाजकरण आणि 5 टक्के राजकारण करायचे आहे. उमेदवारबद्दल चर्चा झाली. आपला बाप (समाज) 20 तारखेला येणार आहे, आणि तो बाप निर्णय घेणार आहे. शेती, आरक्षण, दलित मुस्लिम, गोरगरीब ओबीसींच्या मुद्द्यावर चर्चा झाली. मी सर्वांचे मते जाणून घेतली. उद्या कोणीही बोलु नये की, आम्हाला मते मांडू दिली नाहीत. आजपर्यंत 1800 उमेदवारी अर्ज आले आहेत, आणि आज पुन्हा काही अर्ज आले आहेत', असं मनोज जरांगे यांनी सांगितलं.

'ही लाट देवेंद्र फडणीस यांचा कार्यक्रम लावणार आहे. या मनस्थितीमध्ये फडणवीस यांनी जायला भाग पाडले. जो समाज त्यांच्या बाजूने होता त्यांची मुडदे फडवणीस यांनी पाडली. देशातील सर्वात डागी माणूस, आणि देशात पहिला आहे. न्यायाची अपेक्षा फडवणीस यांच्याकडून होती, पण त्यांनी विष आमच्या नारड्यात ओतले. फडवणीस यांनी जाताना खुन्नस दिली आणि मला मराठ्यांशी काही देणेघेणे नाही हे दाखवले. धनगर आरक्षणचा निर्णय फडवणीस यांनी घेतला आणि त्यांनी रद्द केला. वेळ पडली तर मराठे त्यांच्या भाजपचा एन्काउंटर करणार', असा घणाघात मनोज जरांगे यांनी केला.

**अनेक नेत्यांनी घेतली मनोज जरांगे यांची भेट**

दरम्यान, मनोज जरांगे पाटील विधानसभा निवडणुकीसाठी उमेदवार देण्याच्या तयारीत आहेत. लोकसभा निवडणुकीत मनोज जरांगे यांच्या भूमिकेमुळे सत्ताधारी पक्षांना मोठा तोटा सोसावा लागला होता. यानंतर आता विधानसभेत मनोज जरांगे हे स्वतः मराठा समाजाचे उमेदवार उभे करणार आहेत. त्यांच्या या भूमिकेमुळे अनेक राजकीय पक्षांना धडकी भरली आहे. त्यामुळे अनेक आजी-माजी आमदारांनी आतापर्यंत मनोज जरांगे यांची अंतरवली सराटीत जावून त्यांची भेट घेतली आहे.

विशेष म्हणजे नुकतंच माजी आरोग्य मंत्री राजेश टोपे यांनी जरांगे यांची भेट घेतल्याची माहिती समोर आली. त्यानंतर आज मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी मनोज जरांगे यांची भेट घेतल्याची माहिती समोर आली आहे. दरम्यान, अंतरवली सराटीमध्ये सध्या मनोज जरांगे पाटील हे ज्यांनी विधानसभा उमेदवारासाठी इच्छुक असलेल्या उमेदवारांशी चर्चा करत आहेत. या बैठकीला राज्यभरातून मोठ्या प्रमाणात उमेदवार उपस्थित झाले होते. या बैठकीसाठी आलेल्या गाड्यांची 10 एकरच्यावर जागेत पार्किंगची व्यवस्था करण्यात आली आहे.

## मविआतुन बबनराव शिंदेंच्या उमेदवारीला मोहिते पाटलांचा विरोध; माढ्यातलं राजकारण तापणार

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** लोकसभेला मोहिते पाटील घराण्याने भाजपला रामराम करत शरद पवारांच्या राष्ट्रवादीत प्रवेश केला. त्यानंतर सोलापूरच्या राजकारणातील समीकरणे बदलल्याचे दिसत आहे.

दरम्यान अजित पवार गटाचे माढ्याचे आमदार बबन शिंदे यांना महाविकास आघाडीतून उमेदवारी देण्यास खासदार धैर्यशील मोहिते पाटील यांनी विरोध केल्याने चर्चांना सुरुवात झाली आहे.

आमदार बबन शिंदे यांनी शरद पवारांची भेट घेऊन





माढ्यातून उमेदवारीची मागणी केली आहे. आतापर्यंत आमदार शिंदे यांनी शरद पवारांची तीन वेळा भेट घेतली आहे. काल (दि. १६) बुधवारी देखील आमदार शिंदे यांनी पवारांची भेट घेतली. भेटीनंतर आता माढ्यात राजकीय प्रतिक्रिया उमटू लागल्या आहेत.

दरम्यान माढा तालुक्यातील मानेगाव येथील एका कार्यकत्यार्ने थेट खासदार धैर्यशील मोहिते पाटील यांना फोन करून गद्दारांच्या हाती तुतारी देऊ नका, अशी विनंती करत आमदार शिंदेंना उमेदवारी देऊ नका असे म्हंटले. यावेळी खासदार धैर्यशील मोहिते पाटील यांनी आमच्या कुटुंबाचाही आमदार शिंदेंना महाविकास आघाडीची उमेदवारी देण्यास विरोध असल्याचे म्हटले आहे. त्यामुळे माढ्यातले राजकारण आता अधिकचे रंगू लागल्याचे दिसत आहे.

## राज्य उत्पादन शुल्क, विभागाकडुन सोलापुरात महाराष्ट्र व कर्नाटक राज्याच्या आंतरराज्य समन्वय बैठक संपन्न

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** मा. निवडणुक आयोगाने महाराष्ट्र विधानसभा 2024 चा निवडणुक कार्यक्रम जाहिर केला असुन या अंतर्गत दिनांक 20 नोव्हेंबर 2024 रोजी मतदान होणार आहे. त्याअनुषंगाने सोलापुर जिल्हयास कर्नाटक राज्याची सीमा लगत असल्याने दिनांक 17 ऑक्टोबर 2024 रोजी सोलापुर येथे राज्य उत्पादन शुल्क पुणे विभागाचे विभागीय उप-आयुक्त श्री. सागर धोमकर यांचे निर्देशानुसार सोलापुर जिल्हयाच्या अधीक्षक श्रीमती भाग्यश्री पं. जाधव, राज्य उत्पादन शुल्क, सोलापुर यांनी राज्य उत्पादन शुल्क विभागाचे विभागीय उप-आयुक्त सागर धोमकर यांचे अध्यक्षतेखाली कर्नाटक राज्यातील विजयपुरा जिल्हयाचे राज्य उत्पादन शुल्क विभागाचे उपायुक्त डॉ. संगनगौडा होसळ्ळी व कलबुर्गी जिल्याचे राज्य उत्पादन शुल्क विभागाचे अधीक्षक हनमंतराय वज्रमड्डी, उपअधीक्षक दोडाप्पा हेबळे तसेच सोलापुर जिल्हयातील राज्य उत्पादन शुल्क विभागाचे उप अधीक्षक एस. आर. पाटील, निरीक्षक जे.एन. पाटील, इतर कर्मचारी यांची सोलापुर नियोजन भवन सभागृहात आंतरराज्य समन्वय बैठक पार पडली.

या बैठकीमध्ये राज्य उत्पादन शुल्क विभागाचे विभागीय उप आयुक्त, श्री. सागर धोमकर यांनी आगामी होणा-या विधानसभा निवडणुक 2024 च्या अनुषंगाने सर्व अधिकारी व कर्मचारी यांचेशी सविस्तर चर्चा करुन सोलापुर जिल्हयास कर्नाटक राज्याची सीमा लगत असल्याने निवडणुक कालावधीमध्ये कर्नाटक राज्यातुन कोणत्याही प्रकारे अवैध दारुची वाहतुक, विक्री, निर्मिती होणार नाही याबाबत प्रतिबंध करण्याकरीता दोन्ही राज्यातील उत्पादन शुल्क विभागातील अधिकाऱ्यांनी परस्परांत समन्वय ठेवुन दोन्ही राज्यात सीमावर्ती भागातील चेकपोस्ट द्वारे आंतरराज्य माल वाहतुक व प्रवासी वाहतुक करणाऱ्या सर्व वाहनांची अत्यंत सुक्ष्मपणे तपासणी करावी व कसून चौकशी करुन एकाहो वाहनातुन अवैध दारु तस्करी होणार नाही याची खबरदारी घ्यावी. सीमावर्ती भागामध्ये दोन्ही राज्यांच्या राज्य उत्पादन शुल्क विभागांनी अवैध दारु तस्करी करणा-याच्या माहितीचे संकलन करुन परस्परांना द्यावी. सीमावर्ती भागामध्ये सामुहिक मोहिमा राबविणे, अवैध दारु साठवणुक ठिकाणे व हातभट्टी ठिकाणांची गोपनिय माहिती काढुन त्यावर कारवाई करणे, सीमेवरील दारु दुकानांच्या दारु विक्री व्यवहारांवर कठोर नियंत्रन ठेवावे अशा सुचना विभागीय उप आयुक्त, सागर धोमकर यांनी दिल्या आहेत.

विधानसभा सार्वत्रिक निवडणूक-2024 च्या अनुषंगाने राज्य उत्पादन शुल्क, सोलापुर यांनी अवैध मद्य विक्री/वाहतूक विरोधात कर्नाटक राज्याच्या सीमेवर सीमा तपासणी नाका उभारण्यात येणार असुन अवैध मद्य विक्री/वाहतूक विरोधात विविध पथके नियुक्त केले आहेत, सदर पथके दिवसा तसेच रात्री देखील कार्यरत आहेत.

अवैध मद्यविक्री, अवैध धंदे व वाहतूकी विरोधात कारवाई यापुढेही चालु राहणार असून, अवैध मद्याबाबत माहिती असल्यास टोल फ्री 18002339999 क्रमांक अथवा व्हॉटस ॲप क्रमांक 8422001133 या कार्यालयास माहिती दिल्यास माहिती देणाऱ्याचे नांव गुप्त ठेवले जाईल असे अधीक्षक, राज्य उत्पादन शुल्क, सोलापुर श्रीमती. भाग्यश्री पं. जाधव, यांनी सांगुन अवैध मद्याबाबतची माहिती कळविण्याचे आवाहन केले आहे.

## आचारसंहिता तक्रार निवारण कक्ष स्थापन टोल फ्री क्रमांक 18002331240 कार्यान्वित

**पंढरपूर (कटूसत्य वृत्त):-** विधानसभा निवडणुकीच्या अनुषंगाने नागरिकांना व मतदारांना निवडणूक व आचारसंहिता आदीबाबत माहिती मिळावी व तक्रारींचे निवारण व्हावे यासाठी निवडणूक नियंत्रण व समन्वय कक्ष, प्रांत कार्यालय पंढरपूर येथे तक्रार निवारण केंद्र स्थापन करण्यात आले आहे. हे तक्रार निवारण केंद्र चोविस तास कार्यरत राहणार असून नागरिकांच्या निवडणुकीसंदर्भात असलेल्या तक्रारीचे या केंद्रामार्फत निवारण करण्यात येणार आहे.

टोल फ्री क्रमांक 18002331240 हे तक्रार निवारण केंद्राचा टोल फ्री क्रमांक आहे. पंढरपूर विधानसभा मतदार संघातील निवडणुकीसंदर्भात नागरिकांनी व मतदारांनी या टोल फ्री क्रमांकावर संपर्क साधावा. असे आवाहन 252 पंढपूर विधान सभा मतदार संघाचे निवडणूक निर्णय अधिकारी सचिन इथापे यांनी केले आहे.

## मतदारांनी आपले नांव मतदार यादीत असल्याची खात्री करावी

निवडणूक आयोगाने राज्यातील विधानसभा निवडणुकीचा कार्यक्रम जाहीर केला आहे. दि.20 नोव्हेंबर रोजी मतदान होणार आहे, तर 23 नोव्हेंबरला मतमोजणी होणार आहे. या निवडणुकीत प्रत्येक मतदारांनी आपला मताधिकार बजावून सहभाग नोंदवावा. मतदानाचा हक्क नोंदवण्यासाठी मतदार यादीत आपले नाव असणे अत्यावश्यक आहे. मतदारांनी आपले नांव मतदार यादीत असल्याची खात्री करावी. आपले नाव मतदार यादीत आहे किंवा नाही याची खात्री करण्यासाठी https://voters.eci.gov.in/ व या लिंकचा वापर करावा असे आवाहनही 252 पंढपूर विधान सभा मतदार संघाचे निवडणूक निर्णय अधिकारी सचिन इथापे यांनी केले आहे.

## दुचाकी वाहनांसाठी आकर्षक नोंदणी क्रमांक राखून ठेवणेकरिता अर्ज करण्याचे आवाहन

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** प्रादेशिक परिवहन कार्यालय, सोलापूर या कार्यालयात लवकरच दुचाकी वाहनांसाठी नवीन मालिका सुरु होणार असून ,वाहनांची नवीन मालिका चालू होण्याच्या दिवशी प्रादेशिक परिवहन कार्यालयामध्ये मोठ्या प्रमाणावर इच्छुकांची गर्दी होते व त्यामुळे कार्यालयीन व्यवस्थेवर त्याचा ताण पडतो व बऱ्याच वेळा नागरिकांनाही याचा त्रास होतो. नागरिकांना होणारा त्रास कमी व्हावा व त्यांना हवा असणारा आकर्षक नोंदणी क्रमांक उपलब्ध असल्यास त्यांना सुलभतेने तो मिळावा, यासाठी ज्या दुचाकी वाहन मालकांना आकर्षक तसेच पसंतीचे क्रमांक विहीत शुल्क भरुन हवे असतील त्यांनी दिनांक 21ऑक्टोबर 2024 रोजी सोबतच्या वेळापत्रकानुसार कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी सकाळी 11.00 ते दुपारी 4.00 या दरम्यान विहीत नमुन्यातील अर्जामध्ये कार्यालयाच्या नवीन नोंदणी विभागात डीडी (केवळ क्र 16 अन्वये जारी झालेले डी डी), पत्त्याचा पुरावा, आधार लिंक मोबाईल नंबर, ओळखपत्र, पॅनकार्डच्या साक्षांकित प्रतीसह स्वतः जमा करावा. सदर डीडी फक्त" Dy R.T.O. Solapur " यांच्या नावे नॅशनलाईज शेडयुल्ड बँकेचा असावा. या व्यतिरिक्त इतर नावाचे डीडी बाद ठरवले जातील.

अजासीबत केंद्रिय मोटार वाहन नियम 1989 च्या नियम ४ तसेच महाराष्ट्र मोटार वाहन नियम 1989 च्या नियम 5 अ मध्ये विहीत केलेल्या पत्त्याच्या पुराव्याची साक्षांकित प्रत सादर करणे आवश्यक असेल (उदा. आधार कार्ड, टेलिफोन बोल इ.) एकाच नंबरकरिता एकापेक्षा जास्त अर्ज आल्यास त्यांची यादी दि. 21ऑक्टोबर 2024 रोजी दुपारी 05.00 वाजता कार्यालयीन नोटीसबोर्डवर लावण्यात येईल. या यादीतील अर्जदारांना लिलावाकरिता जर जास्त रक्कमेचा डीडी जमा करावयाचा असेल त्यांनी सोबतच्या वेळापत्रकानुसार दर्शविलेल्या दिवशी (दि. 22 ऑक्टोबर 2024 रोजी दुपारी 02:00 वाजेपर्यंत) सीलबंद लिफाफ्यात कार्यालयात जमा करावा, लिलावासाठी सादर केलेला डीडी रुपये 300/- पेक्षा कमी रकमेचा नसावा. सदर डीडी फक्त "Dy R.T.O. Solapur "यांच्या नावे नॅशनलाईज शेडयुल्ड बँकेचा असावा. या व्यतिरिक्त इतर नावाचे डीडी बाद ठरवले जातील डोडी कमीत कमी एक महिना मुदतीमध्ये असावा, दिनांक 22 ऑक्टोबर 2024 रोजी दुपारी 04 वाजता सहाय्यक प्रादेशिक परिवहन अधिकारी, सोलापूर यांच्या उपस्थितीत पात्र व्यक्तीसमोर (संबंधित अर्जदार) लिफाफे उघडुन ज्या अर्जदाराने विनिर्दिष्ट शुल्कापेक्षा जास्तीत जास्त रकमेचा डीडी सादर केला असेल त्यास नमूद पसंती क्रमांक वितरीत केला जाईल,

एकदा राखून ठेवलेला नोंदणी क्रमांक बदलून देता येणार नाही, नोंदणी क्रमांक राखून ठेवलेल्या दिनांकापासून 180 दिवसांच्या आत नोंदणीसाठी वाहन सादर करून वाहन क्रमांक प्राप्त करून घ्यावा अन्यथा राखून ठेवलेला नोंदणी क्रमांक आपोआप रह होईल व फी सरकारजमा होईल, कोणताही विशिष्ट नोंदणी क्रमांक राखीव ठेवण्यासाठी प्रदान केलेली की, कोणत्याही परिस्थितीत परत करता येणार नाही अथवा त्याचे समायोजन करता येणार नाही. वाहन धारकाने एका वाहनासाठी एकापेक्षा जास्त आकर्षक नोंदणी क्रमांक आरक्षित करण्यासाठी कार्यालयात डी. डी. जमा केल्यास सदर बाबीस कार्यालय जबाबदार राहणार नाही. अशी माहिती प्रादेशिक परिवहन अधिकारी कार्यालय सोलापूर यांच्या कडून मिळाली आहे.

**दुचाकी वाहनांच्या मालिकेचे वेळापत्रक** (MH 13 EQ)

दिनांक- 21 ऑक्टोबर 2024- तिप्पट शुल्कचे अर्ज व परिवहन संवर्ग वाहनांसाठी नियमित अर्ज स्विकारणे.- वेळ - 11 ते 4

दि. 21 ऑक्टोबर 2024 - सायंकाळी 05.00 वाजता यादी जाहीर,

दि. 22आक्टोबर 2024 - दुपारी ०२ वाजेपर्यत बंद लिफाफ्यात लिलावासाठीचे डीडी स्विकारणे . रुपये 300/- पेक्षा जास्त रकमेचे डीडी जमा करणे गरजेचे.

दि. 22आक्टोबर 2024- तिप्पट शुल्काच्या आलेल्या अजार्साठी व परिवहन संवर्ग वाहनांसाठी आलेल्या डबल अर्जाचा लिलाव दुपारी 04.00 वाजता.

## तिसरी आघाडी 150 जागा लढणार, शिंदे-फडणवीसांविरुद्ध बच्चू कडू भिडणार; शरद पवारांवरही हल्लाबोल

**मुंबई (कटूसत्य वृत्त):-** परिवर्तन महाशक्तीची महत्त्वाची बैठक पार पडली. या बैठकीला छत्रपती संभाजीराजे, बच्चू कडू आणि राजू शेट्टी उपस्थित होते. या बैठकीत 150 जागाबाबतचा निर्णय घेण्यात आला आहे. लवकरच इतर जागांवरचा निर्णय देखील घेण्यात येणार आहे. बरेच लोक आमच्याकडे येण्यास इच्छुक असल्याची माहिती परिवर्तन महाशक्तीच्या नेत्यांनी दिली आहे. एकनाथ शिंदे असो की देवेंद्र फडणीस यांच्या विरोधात देखील उमेदवार देणार असल्याची माहिती



देण्यात आली आहे.

दरम्यान, मनोज तरंगे पाटील यांच्याशी देखील आमचं बोलणं सुरु आहे. ते आमच्या सोबत येतील असे प्रयत्न सुरु असल्याची माहिती परिवर्तन महाशक्तीच्या नेत्यांनी दिली आहे. तसेच महादेव जानकर देखील आमच्यासोबत येतील असा विश्वास नेत्यांनी व्यक्त केला आहे.

सामान्य माणसाला आपलं वाटेल असं सरकार आम्ही स्थापन करण्याचा प्रयत्न करु असे बच्चू कडू म्हणाले. आम्ही चांगले उमेदवार देणार असल्याचे कडू म्हणाले. पवारसाहेब म्हणतात परिवर्तन आणू, तुम्ही कसलं परिवर्तन आणणार आहात? असा सवालही कडू यांनी केला. तुम्ही इतके दिवस सत्तेत होते, मग आता कसं काय परिवर्तन तुम्ही करणार? असा सवालही कडू यांनी उपस्थित केला. परिवर्तनाचा अधिकारी युतीलाही नाही आणि आघाडीलाही नाही. परिवर्तनाची भाषा करण्याचा अधिकार आम्हाला असल्याचे कडू म्हणाले. नवीन परिवर्तन हे खऱ्या अर्थानं कामाचं असेल, बजेटमधील हिस्सा हा सामान्य माणसाचा असल्याचे कडू म्हणाले.

## आचारसंहिता कालावधीत जिल्हा लोकशाही दिन होणार नाही

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** अतिरिक्त मुख्य निवडणुक अधिकारी, महाराष्ट्र राज्य यांचेकडील पत्र दि. 15 ऑक्टोबर 2024 अन्वये विधानसभा सार्वत्रिक निवडणुक 2024 चा कार्यक्रम घोषित झाल्याने निवडणुक कार्यक्रमानुसार सोलापूर जिल्हयामध्ये विधानसभेच्या सार्वत्रिक निवडणुका घेण्यात येणार आहेत. निवडणुकांची आचार संहिता दि. 15 ऑक्टोबर 2024 ते 25 नोव्हेंबर, 2024 पर्यंत असल्याने शासनाचे सामान्य प्रशासन विभागाचे परिपत्रक अन्वये आचार संहिता कालावधीत लोकशाही दिनाचे आयोजन करु नये असे नमूद केलेले आहे.

त्यामुळे विधानसभा सार्वत्रिक निवडणुक 2024 ची आचार संहिता असल्याने या कालावधीमध्ये सोलापूर जिल्हयात दरमहा पहिल्या सोमवारी होणारा जिल्हा लोकशाही दिन (माहे नोव्हेंबर 2024) मध्ये आयोजित केला जाणार नाही, असे निवासी उपजिल्हाधिकारी मनिषा कुंभार यांनी कळविले आहे.

पाहिजेत

दैनिक सोलापूर कटूसत्य | सोलापूर वृत्तदर्पण

सोलापूर वृत्तदर्पण व दैनिक कटूसत्य या माध्यमांच्या वतीने एक अभिनव व अनोखी योजना राबविण्याचा संकल्प आहे. त्यासाठी सोलापूर शहरातील प्रत्येक प्रभागात व जिल्ह्यातील प्रत्येक तालुक्यात कायम पगारावर खालील पदे भरावयाची आहेत. या करीता सोलापूर शहरातील प्रत्येक प्रभाग, उत्तर सोलापूर, दक्षिण सोलापूर, अक्कलकोट, बार्शी, मोहोळ, माढा, करमाळा, पंढरपूर, माळशिरस, सांगोला, मंगळवेढा या तालुका परीसरात एक प्रतिनिधी नेमणे आहेत. ही योजना यशस्वी करण्यासाठी खालील पदे भरावयाची आहेत.

| अ.क्र. | पदाचे नाव | पद संख्या | शैक्षणिक पात्रता | लिंग | पगार/मानधन व कमिशन (मासिक) | अनुभव |
|---|---|---|---|---|---|---|
| १) | व्यवस्थापक | २ | एम. बी.ए./ पदवीधर | स्त्री/पु | १५००० ते २०००० रुपये. | असल्यास प्राधान्य |
| २) | सहाय्यक व्यवस्थापक | ४ | एम. बी.ए./ पदवीधर | स्त्री/पु | १०००० ते १५००० रुपये | असल्यास प्राधान्य |
| ३) | सह संपादक | ५ | वृत्तपत्र पदविका / पदवीधर | स्त्री/पु | अपेक्षे प्रमाणे | असल्यास प्राधान्य |
| ४) | उप संपादक | ५ | वृत्तपत्र पदविका / पदवीधर | स्त्री/पु | अपेक्षे प्रमाणे | असल्यास प्राधान्य |
| ५) | पत्रकार / वार्ताहर | २५ | १२ वी ते पदवीधर | स्त्री/पु | ३००० ते १५००० रु. व कमिशन | असल्यास प्राधान्य |
| ६) | कॅमेरामन | २५ | १० वी ते पदवीधर | स्त्री/पु | ३००० ते १५००० रु. व कमिशन | असल्यास प्राधान्य |
| ७) | मार्केटींग प्रतिनिधी | ६५ | १० वी ते पदवीधर | स्त्री/पु | ५००० ते १५००० रु. व कमिशन | असल्यास प्राधान्य |
| ८) | जाहिरात प्रतिनिधी | ६५ | १० वी ते पदवीधर | स्त्री/पु | ५००० ते १५००० रु. व कमिशन | असल्यास प्राधान्य |
| ९) | प्रशिक्षण अधिकारी | १ | एम. बी.ए. / पदवीधर | स्त्री/पु | ५००० ते १५००० रुपये. | असल्यास प्राधान्य |
| १०) | वसूली प्रतिनिधी | ५ | १० वी ते पदवीधर | स्त्री/पु | ५००० ते १५००० रु. व कमिशन | असल्यास प्राधान्य |

नियम व अटी :- १) इच्छूक उमेदवारांनी आपल्या स्वहस्ताक्षरात संपूर्ण माहिती असलेला अर्ज भरून, त्या सोबत शाळेचा दाखला, मार्कलिस्ट, भारतीय असल्याचा पुरावा, दोन फोटो जोडून, खालील पत्यावर १५ दिवसाच्या आत आणून द्यावे. २) वयोमर्यादा १८ वर्ष पूर्ण ते ४५ वर्षांपर्यंत, एक उमेदवार दोन पदासाठी अर्ज करु शकतो. ३) सर्व अधिकार वृत्तदर्पण कडे राखीव राहतील आणि ते अर्जदारांवर बंधनकारक राहतील. वृत्तदर्पण चा निर्णय अंतिम राहील. ४) सदरच्या नियुक्त्या केवळ मुलाखती घेवूनच केल्या जातील. आमच्या व आपल्या वेळेनुसार मुलाखत घेतली जाईल. उमेदवारांनी याची नोंद घ्यावी. ५) अर्ज स्वीकारण्याची वेळ रविवार सोडून सकाळी १० ते सायं. ६ वाजेपर्यंत. ६) मुलाखतीनंतर निवड झालेल्या सर्व उमेदवारांना मोफत प्रशिक्षण दिले जाईल. ७) स्वतःचे वहान असणाऱ्यास प्राधान्य.

फोन : 0217-2605091 मो.9657069069

संपर्क :- वृत्तदर्पण कार्यालय, एफ-३, वृंदावन पार्क, चेतन फौन्ड्रीसमोर, होटगी रोड, सोलापूर-३.

## संपादकीय

# ओव्हर टू मतदारराजा

देशातील सर्वात बहुचर्चित राज्य ठरलेल्या महाराष्ट्र विधानसभेच्या निवडणुकीची घोषणा करण्यात आली आहे. 20 नोव्हेंबर रोजी मतदान होऊन 23 नोव्हेंबर रोजी मतदारांनी कोणाच्या हातात महाराष्ट्राची सत्ता दिली आहे, हे स्पष्ट होईल.

साहजिकच गेल्या काही कालावधीमध्ये विविध राजकीय पक्षांनी राजकीय व्यासपीठावर अप्रत्यक्ष प्रचाराच्या निमित्ताने जो खेळ मांडला होता त्याचा पहिला अंक आता संपला असून आगामी कालावधीमध्ये अधिकृत प्रचारसभांचा दुसरा अंक सुरू होईल. अर्थात, हे सर्व राजकीय नाटक पाहणाऱ्या मतदाराकडेच आता सर्व सूत्रे गेली आहेत.

गेली पाच वर्षे महाराष्ट्रातील राजकारणावर बारीक लक्ष ठेवून असणारा हा मतदार यावेळी कोणता कौल देतो याची उत्सुकता यावेळी सर्वात जास्त असणार आहे. केवळ महाराष्ट्राच्या नाही तर देशाच्या लोकशाही निवडणुकीच्या इतिहासामध्ये सर्वात चुरशीची निवडणूक म्हणून या महाराष्ट्र विधानसभेच्या निवडणुकीकडे पाहावे लागणार आहे. नुकत्याच झालेल्या लोकसभा निवडणुकीमध्ये मतदारांनी ज्या प्रकारे कौल देऊन आपली मनस्थिती स्पष्ट केली आहे त्याचा विचार करता महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीबाबतही मतदारांची मनस्थिती कशी असणार आहे हे सर्वात जास्त महत्त्वाचे ठरणार आहे.

पाच वर्षापूर्वी म्हणजे 2019 मध्ये जेव्हा विधानसभेची निवडणूक झाली होती तेव्हा ती लढत सरळ सरळ एका बाजूला भाजपा-शिवसेना युती आणि दुर्सया बाजूला काँग्रेस-राष्ट्रवादी आघाडी यांच्यामध्ये होती. पण गेल्या पाच वर्षांच्या कालावधीमध्ये घडलेल्या विविध फाटाफुटीच्या घटनांमुळे आता सत्ताधारी बाकावरील तीन पक्ष आणि विरोधी बाकावरील तीन पक्ष एकमेकांसमोर उभे ठाकले आहेत. या व्यतिरिक्त महाराष्ट्र नवनिर्माण सेना, वंचित आघाडी, नव्याने निर्माण झालेली तिसरी आघाडी या सर्व राजकीय पक्षांच्या जोडीने काही सामाजिक संघटनासुद्धा या निवडणुकीमध्ये उतरल्या आहेत.

विधानसभा निवडणुकीची घोषणा झाल्यावर ज्या प्रकारे मराठा आरक्षण आंदोलनाचे नेतृत्व करणारे मनोज जरांगे यांनी या निवडणुकीमध्ये आता आम्हीही उतरणार आहोत, अशी घोषणा केली आहे ती निश्चितच महत्त्वाची आहे. दुसरीकडे, ओबीसी गटाचे नेतृत्व करणारे लक्ष्मण हाके यांनीसुद्धा या निवडणुकीमध्ये आमची भूमिका महत्त्वाची ठरणार असल्याची घोषणा केली आहे. आतापर्यंत जरी राजकीय पक्ष पातळीवर निवडणुका लढवल्या जात असल्या तरी यावेळी प्रथमच या निवडणुकींना सामाजिक संदर्भ आहेत. अर्थात, जरांगे यांनी थेटपणे सरकारच्या विरोधात भूमिका घेतली असल्यामुळे आपोआपच त्यांचा पाठिंबा महाविकास आघाडीला अप्रत्यक्षपणे का होईना असणार आहे. दुसरीकडे, ओबीसी आघाडीचे नेतृत्व करणारे लक्ष्मण हाके यांनी मनोज जरांगे यांना विरोध करण्याच्या निमित्ताने सत्ताधारी आघाडीलाच अप्रत्यक्षपणे पाठिंबा देण्याचे काम केले आहे.

म्हणून जरांगे यांना मानणारा मराठा मतदार असो किंवा गेल्या काही कालावधीमध्ये ध्रुवीकरण झाल्यामुळे नव्याने जागरूक झालेला ओबीसी मतदार असो त्यांची भूमिका या निवडणुकीमध्ये निश्चितच महत्त्वाची ठरणार आहे. या सर्व सामाजिक घडामोडींची जाणीव असल्यामुळेच मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखालील महायुतीने गेल्या काही कालावधीमध्ये घेतलेल्या विविध निर्णयांवर जर नजर टाकली तर विविध जाती गटांना खूश करण्यासाठीच हे निर्णय घेण्यात आले आहेत हे उघड आहे. विविध समाजासाठी स्थापन करण्यात आलेली आर्थिक विकास महामंडळे असोत किंवा अगदी शेवटच्या क्षणी महाराष्ट्र विधानपरिषदेवर बंजारा समाजाचे प्रतिनिधित्व करणारे धर्मगुरू बाबुसिंग महाराज राठोड किंवा मुस्लीम समाजाचे प्रतिनिधित्व करणारे सांगलीचे इद्रीस नायकवडी यांची नियुक्ती पुरेशी बोलकी आहे.

हरियाणात भारतीय जनता पक्षाने अशाच प्रकारची रणनीती अवलंबून केवळ जाट समाजाला खूश न करता इतर सर्व समाज घटकांना खूश करण्याची भूमिका घेतली होती. त्याचा फायदा त्यांना मिळाला होता. तीच रणनीती आता महाराष्ट्रात वापरण्यात येत आहे. अर्थात, या सर्वांमध्ये सरकारची जी 'लाडकी बहीण' योजना आहे त्याचा फायदा सरकारी पक्षाला कितपत मिळतो हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे. या महिलांनी जर त्यांना झालेल्या आर्थिक समाधानाचे परिवर्तन मतदानामध्ये केले आणि सरकारी पक्षाला पाठिंबा दिला तर महायुतीला पुन्हा सत्ता मिळू शकते.

साहजिकच प्रचारामध्ये 'लाडकी बहीण' योजना हाच विषय महत्त्वाचा ठरणार आहे. दुसरीकडे, विरोधी महाविकास आघाडीला मात्र एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखालील सरकार कसे घटनाबाह्य आहे आणि इतर राजकीय पक्षांची फोडाफोडी करून चुकीच्या पद्धतीने कशी सत्ता मिळवण्यात आली आहे याचा प्रचार करावा लागणार आहे. म्हणजेच एकीकडे आता सत्ताधारी बाकावरील राजकीय पक्ष, दुसरीकडे विरोधी बाकावरील राजकीय पक्ष, तिसरीकडे तिसरी आघाडी आणि इतर काही राजकीय पक्ष आणि चौथ्या बाजूला मराठा आणि ओबीसी संघटनांचा दबाव गट अशा पार्श्वभूमीवरच ही निवडणूक लढली जाणार आहे. ही निवडणूक एकाच टप्प्यात होणार असल्यामुळे मतदारांची मनस्थिती बदलण्याची शक्यताही खूप कमी आहे. आगामी कालावधीमध्ये या सर्व आघाड्या निवडणुकीच्या प्रचाराच्या निमित्ताने आपली बाजू कशाप्रकारे मांडतात आणि मतदारांची मनस्थिती आपल्यासाठी सकारात्मक कशी तयार करू शकतात यावर सर्व काही अवलंबून आहे. लोकसभा निवडणुकीमध्ये ज्या प्रकारे मतदारांनी महाराष्ट्रात महायुतीच्या विरोधात कौल दिला होता त्याच्या आधारे महाविकास आघाडीसाठी जरी सकारात्मक वातावरण असल्याचे दिसत असले, तरी लोकसभा निवडणुकीनंतरच्या कालावधीमध्ये सत्ताधारी महायुतीने हे वातावरण बदलण्यासाठी जाणीवपूर्वक प्रयत्न केले आहेत. साहजिकच मतदार या सर्व गोष्टींना कसा प्रतिसाद देतो यावर सर्व काही अवलंबून आहे. म्हणजेच आगामी कालावधीमध्ये मतदार हा राजा असणार आहे आणि या लोकशाही उत्सवाची सर्व सूत्रे आता मतदाराकडेच गेली आहेत.

## एस व्ही सी एस च्या दोन विद्यार्थ्यांची विभागीय स्पर्धेसाठी निवड

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** राजीव गांधी इनडोअर स्टेडियम येथे झालेल्या १९ वर्षे वयोगट मुली कॅरम स्पर्धेत एस व्ही सी एस हायस्कूल एमआयडीसीची राणी काळे हिने उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन करून यश मिळविले असून तिची विभागीय स्पर्धेसाठी निवड झाली आहे व एस आर पी कॅम्प सोरेगाव येथे झालेल्या १७ वर्षे वयोगट मुले शहर जिल्हास्तरीय उंच उडी स्पर्धेत सिद्धाराम मरबगी यानेही प्रथम क्रमांक पटकावला असून त्याची ही विभागीय स्पधेर्साठी निवड झालेले आहे या विद्यार्थ्यांना क्रीडा शिक्षक हनुमंत येळमेली यांचे मार्गदर्शन लाभले यशस्वी विद्यार्थी व मार्गदर्शक शिक्षकांचे प्रशालेचे मुख्याध्यापकसगंप्पा म्हमाणे, उपमुख्याध्यापक धनंजय नकाते व पर्यवेक्षक संतोष कुमार तारके यांनी अभिनंदन व सत्कार करून पुढील स्पधेर्साठी शुभेच्छा दिल्या.





# वाचन प्रेरणा दिन

आज १५ ऑक्टोबर भारताचे माजी राष्ट्रपती मिसाईल मॅन डॉ ए पी जे अब्दुल कलाम यांचा जन्मदिवस. वाचन आणि लेखन आवडणारे भारताचे माजी राष्ट्रपती डॉ ए पी जे अब्दुल कलाम यांच्या स्मरणार्थ आजचा दिवस संपूर्ण देशात वाचन प्रेरणा दिन म्हणून साजरा केला जातो. देशातील प्रत्येक व्यक्ती सकारात्मक विचार करून स्वतःला समृद्ध कसा करेल आणि त्यायोगे देश महासत्ता कसा बनेल असाच विचार माजी राष्ट्रपती डॉ अब्दुल कलाम करत असत. अब्दुल कलाम यांनी १९९६ साली इंडिया २०२० हे पुस्तक लिहिले. याच पुस्तकाच्या आधारे तेंव्हाच्या नियोजन आयोगाने व्हिजन २०२० तयार केले. डॉ अब्दुल कलाम यांनी अग्निपंख नावाने आत्मचरित्र लिहिले त्यात त्यांनी बालपणापासून राष्ट्रपती बनण्यापर्यंतच्या प्रवासाचे वर्णन केले आहे. डॉ अब्दुल कलाम यांनी एकूण २४ पुस्तके लिहिली असून त्यातील बहुतांशी पुस्तके विद्यार्थी आणि शिक्षकांसाठीच लिहीली आहेत. विद्यार्थ्यांनी जास्तीतजास्त पुस्तके वाचून स्वतःचे ज्ञान दृढ करावे असा त्यांचा आग्रह होता. वाचनानेच माणूस समृद्ध बनतो असे त्यांचे मत होते. त्यासाठी लहान वयातच मुलांमध्ये वाचनाची आवड निर्माण करावी असे ते नेहमी म्हणत.

आजचा दिवस वाचन प्रेरणा दिन म्हणून साजरा करण्यामागचे मुख्य कारण म्हणजे आजच्या मोबाईल, इंटरनेट आणि सोशल मीडियाच्या युगात विद्यार्थ्यांचे वाचन कमी होत चालले आहे. पूर्वी विद्यार्थ्यांमध्ये जशी वाचनाची आवड होती तशी वाचनाची आवड आजच्या विद्यार्थ्यांमध्ये दिसून येत नाही. आजच्या सोशल मीडिया व इंटरनेटच्या युगात पुस्तक वाचनाचे प्रमाण दिवसेंदिवस कमी होत चालले आहे. विद्यार्थ्यांमधील अवांतर वाचनाची गोडी कमी होत चालली आहे. पूर्वी गजबजणारी वाचनालये आता ओस पडू लागली आहेत. ग्रंथालयातील पुस्तके वषार्नुवर्षे एकाच जागी धूळ खात पडत आहेत. साहित्य संमेलनामध्ये पुस्तकांची विक्री कमी होऊ लागली आहे.

आजची पिढी सोशल मीडियाच्या आहारी गेल्याने पुस्तकांपासून दूर होत चालली आहे. सोशल मीडियाच्या आक्रमणामुळे विद्यार्थी अवांतर वाचन विसरून चालले आहेत. सोशल मीडियामुळे वाचन संस्कृती लोप पावत चालली आहे. वाचन संस्कृती टिकवण्यासाठी आणि विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची आवड निर्माण करण्यासाठी शाळा महाविद्यालयात हा दिवस साजरा केला जातो. या दिवशी शाळा महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना वाचनासाठी पुस्तके दिली जातात. वाचलेल्या पुस्तकांवर चर्चा केली जाते. आजच्या दिवशी शाळा महाविद्यालयात तसेच सरकारी आस्थापनात विविध कार्यक्रम, चर्चासत्रे, प्रशिक्षणे आयोजित केली जातात. वाचन संस्कृती जोपासण्यासाठी सवार्नी आपल्या मित्रांना, नातेवाईकांना एक पुस्तक पुस्तके भेट द्यावे. आजच्या दिवशी प्रत्येकाने किमान एक पुस्तक वाचावे.

वाचन प्रेरणा दिन हा एक स्तुत्य उपक्रम आहे. आजच्या युगात ज्ञान ही खूप मोठी शक्ती आहे, याचाच आपल्याला विसर पडला आहे. वाचनामुळे आपल्याला इतिहासाचे ज्ञान, वर्तमानाचे भान आणि भविष्याचा वेध घेता येतो. ज्ञान मिळवण्याचे सर्वात प्रभावी माध्यम म्हणजे वाचन. सातत्याने वाचन केल्याने आपली ग्रहण क्षमता आणि स्मरण शक्ती अधिकाधिक सशक्त होऊन बुद्धिमत्ता अधिकाधिक प्रगल्भ होते. त्यातून माणसाच्या विचार पातळीचा चोहोबाजूंनी विकास होतो. वाचनामुळेच माणसाच्या व्यक्तिमत्त्वाची जडणघडण होते. वाचनामुळे माणूस सुसंस्कृत होतो. चांगलं वाचल्यावर, चांगलं ऐकल्यावर आपले विचार विवेकशील व प्रगल्भ होतात. त्यातून आपली मनोभावना शुद्ध होते. आपली भाषा तसेच वक्तृत्व विकसित होते. वाचनामुळे आपले व्यक्तिमत्त्व बहरते. वाचन ही जीवनाला उन्नत करणारी बाब आहे यामुळे बुद्धीची मशागत होते. माणसाचे जीवन फुलवण्यात वाचनाचा मोठा वाटा असतो. त्यामुळे वाचनाचा छंद जोपासून आपले जीवन समृद्ध करायला हवे.

मनावरचा ताण कमी करण्यासाठी पुस्तकांच्या सहवासात रमले पाहिजे. चांगल्या पुस्तकांचा, विचारांचा आपल्या जीवनावर सकारात्मक परिणाम होतो आणि आयुष्याकडे पाहण्याचा आपला दृष्टकोन कायमचा बदलतो. ऐतिहासिक पुस्तकांमुळे वाचकांच्या मनात राष्ट्रनिष्ठा निर्माण होते. कथा - कादंबरी वाचनाने वाचकांच्या मनात माणुसकीचा भाव जागृत होतो. काव्य वाचनातून आपल्या मनात संवेदनशीलता निर्माण होते. थोरांची चरित्रे वाचून प्रेरणा मिळते. वर्तमानपत्रे वाचल्याने सामाजिक जाणिव निर्माण होते. पुस्तकांमुळे कमकुवत मनाला धीर मिळतो त्यामुळे निराशेच्या गर्तेत अडकलेला माणूस हत्या, आत्महत्या करण्यापासून परावृत्त होतो. आजकालच्या मुलांना खूप ताण असतो. हा ताण कमी करण्याचे प्रभावी मध्यम म्हणजे वाचन.

एकूणच वाचनामुळे माणूस सर्वगुणसंपन्न होतो त्यांच्यात नैतिकतेची रुजवण होते. आज वाचनाअभावी समाजातील नैतिक मूल्ये हरवत चालली आहेत त्यामुळे नव्या पिढीने पुन्हा एकदा वाचन संस्कृतीकडे वळणे ही काळाची गरज आहे. आपल्या आणि समाजच्या भल्यासाठी वाचन संस्कृती टिकवायलाच हवी. वाचल तर वाचाल या उक्तीप्रमाणे तरुण पिढीला वाचवायचे असेल तर त्यांच्यात वाचन संस्कृती रुजवायलाच हवी. त्यासाठी वाचन प्रेरणा दिन यासारखे उपक्रम नक्कीच उपयोगी ठरेल.



**श्याम ठाणेदार**
दौंड जिल्हा पुणे
९९२२५४६२९५

## प्रबोधन

# लोकसेवा हेच । पुण्यकर्म थोर

'योगी' हा शब्द योग या शब्दापासून तयार झाला. सोबत येणं, जुळणं, जोडणं असे शब्द मूळ धातूला असले तरी, नंतर योगी म्हणजे एकांतवासी, दूर जाणारा, अरण्यसेवी, गुंफानिवासी, तपोमग्न, आत्मलीन असं म्हटलं जाऊ लागलं. भारत हा पाश्चात्त्यांच्या दृष्टीने अद्यापिही साधू-संन्यासी यांचीच भूमी आहे आणि त्यात वावगं असं काही नाही. भारताच्या अनेक डोंगर-पर्वतांच्या गुहांमधून अनेक तपस्वी, योगी आजही आढळतात. मानवी वस्तीपासून दूर, अनेक गैरसोयी मुद्दाम स्वीकारून ही दुर्दैवी माणसं गुहेच्या अंधारात डोळे मिटून वर्षानुवर्ष बसावीत, ही मानवी जीवनाची घोर उपेक्षा म्हणावी लागेल. या अभाग्यांनी सोन्यासारखं शरीर, मन, बुद्धी अक्षरशः मातीमोल करून सोडलेली असते. शाहीर रामजोशी यांना दोष देताना म्हणतात, हटातटाने पटा रंगवून जटा धरिशी का शिरी, मठाची उठाठेव का करी. या संन्याशांकडून स्वतःचंही भलं होणं शक्य नाही. तेथे दुसऱ्यांचं कल्याण कसं शक्य होईल? 'ही काय भवाला दूर करतील माकडे?' ही शोकांतिका म्हणूनच शाहीर व्यक्त करतात. म्हणूनच सामाजिक, राष्ट्रीय, मानवीय अशा संदभार्तून पाहिलं, तर योगी शब्दाने आपला जुळणे, जोडणे, सोबत असणे, हा अर्थ गमावला आहे. असंच म्हटलं पाहिजे.

संत तुकाराम हे गृहस्थाश्रमी संत होते. घरदार सांभाळून बायको, मुलं-बाळं यांच्यासमवेत त्यांनी आयुष्य घालवलं. त्यांना समाजविन्मुख, गुहांतून राहाणाऱ्या योगमार्गी संन्याशांचा राग येई. आपल्या एका अभंगातून तो राग व्यक्त करताना ते म्हणतात, भगवे तरी श्वान, सहज वेष त्याचा। तेथे अनुभवाचा काय पंथ ॥ वाढवूनी जटा फिरे दाही दिशा । तरी जंबुवेशा सहज स्थिती ॥ कोरोनिया भूमी करिती मधी वास। तरी उंदरास काय वाणी? । तुका म्हणे ऐसे कासया करावे। देहासी दंडावे वाउगेचि ॥ अर्थात, 'भगवं वस्त्र धारण करून मोक्ष मिळणार असेल, तर निसर्गतः ज्या कुत्र्या-मांजरांचा रंग भगवा आहे ती स्वगार्ला गेली असती. डोईवर जटांचं जाळं वाढवल्याने मोक्षप्राप्ती होत असेल, तर रानातील अस्वलं मोक्षपद मिळवू शकतील. गुहेमध्ये राहिल्यामुळे जर माणूस स्वतःचा उद्धार करू शकला असता, तर बिळातच जे उंदीर- घुशीसारखे प्राणी कायमचे राहातात, त्यांचा उद्धार आधी झाला असता. स्वतःच्या देहाला छळणारे लोक, गुहेमध्ये तपश्चर्येसाठी जाणारे लोक मानवी जीवनाची किंमत ओळखू शकत नाहीत.'

संत तुकारामांना भगव्या रंगात बुचकाळून काढण्याचा प्रयत्न त्यांच्या अनेक चरित्रकारांनी केला असला, तरी ते संन्यस्त वृत्तीचा तिरस्कार करीत, ही वस्तुस्थिती आहे. डॉ. आ. ह. साळुंखे लिहितात, 'तुकारामांनी योगमार्ग जसा अव्हेरला, तसाच योगाशी निगडित असा समाधी हा घटकही नाकारला. म्हणूनच आमच्या बापाने तरी योगसाधना केली होती का? या निःसंदिग्ध शब्दांत योग मार्गाविषयी त्यांनी अनास्था दाखवली आहे.'

पण भारतात खास योग्यांची म्हणून दाखवावीत, पण अशी अनेक ठिकाणं आजही आहेत. पण Cave Dweller अशा शीर्षकाचा एक लेख एका इंग्रजी दैनिकाने ज्या उद्दिष्टाने छापला, ते उद्दिष्ट समाजहिताशी अत्यंत विसंगत आहे. त्यामध्ये ऋषिकेश, बद्रीनाथ, अमरनाथ, जुनागढ, त्रिकूट अशा पर्वतस्थित नैसर्गिक गुंफा आजही तपस्वी निवडतात आणि तेथे ती माणसं स्वतःचा शोध घेतात; जीवनाचा अर्थ शोधतात; अंतर्विश्वाचा वेध घेतात; अंतरात्म्याशी स्वतःला जोडून घेण्याचा प्रयत्न करतात, अशी उद्दिष्टं सांगण्यात आली आहेत. पण ही सारी स्वकेंद्रित, आत्मनिष्ठ, उद्दिष्टं केवळ खऱ्या अर्थाने स्व+अर्थी= स्वार्थी आहेत म्हणूनच ती समाजहितैषी व्यक्तींनी दूर ठेवली पाहिजेत.

गुहेत राहिल्याने जगाचं कल्याण साधता आलं असतं, तर स्वामी विवेकानंद गुहेतच कायमचे राहिले असते. मदर टेरेसांनी गुहेतच जीवन घालवलं असतं. थोर समाजसुधारकांनीही डोंगरपर्वतांच्या गुंफांचा शोध घेतला असता. संत ज्ञानदेवांचा उल्लेख योगीराज असा केला जातो. पण त्यांनी आपलं लेखनकार्य समाजात राहून केलं. समाजाचं बारकाईने निरीक्षण केल्यानंतर लोक व्यवहाराच्या संदर्भासह तत्त्वविवेचन केलं. गुहेत राहाणारा आत्मकेंद्री, समाजापासून दूर गेलेला माणूस जिथे स्वतःला मार्गदर्शन करू शकत नाही, तिथे तो जगाचं कल्याण कसा काय करू शकेल? संत तुकोबांनी खऱ्या संताविषयी म्हटलं आहे, जगाच्या कल्याण, संताच्या विभूती। देह कष्टविती उपकारे। 'योगी' हा अशा अर्थाने थोरपणाला मुकतो, हेच खरं ! म्हणून लक्षात घ्या-

गुहेमध्ये बसे । शोधण्या आत्म्याला
बोलावी दुःखाला । कोणी वेडा ॥ १
आत्मशोध घ्यावा । लोकांत राहून
अंधारी बसून । काय मिळे? ॥२
योग्यांनी हट्टाने । गुंफावास केला
सत्यानाश झाला । जीवनाचा ॥ ३
रंजले-गांजले । त्यांना न दिसले
कधी न द्रवले । चित्त त्यांचे ॥४
अज्ञानी लोकांचे । हाल किती होती
दगडांच्या चित्ती । कसे यावे ?॥५
मनाच्या तळाचा । शोध व्यर्थ आहे
तळठाव आहे। आकाशाला? ॥६
लोकसेवा हेच। पुण्यकर्म थोर
स्वाथार्चा बाजार। पुरे झाला ॥७
गुहेतून पडा। योग्यांनो बाहेर
जगाचा अंधार । मिटवाया ॥८



**प्रा. डॉ. जे. बी. शिंदे**
844/1, साळोखेनगर,
कळंबा रोड, कोल्हापूर-416012
92258 09071

# अरविंद धाम ते देगाव, सीएनएस हॉस्पिटल पर्यंतचा 54 मिनिटात रस्ता पूर्ण होणार

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** शहरातील शाहीर अण्णाभाऊ साठे चौकातील रेल्वे पूल, ज्याचे आयुर्मान संपलेले आहे, दिवाळीनंतर तो पूल रेल्वे प्रशासन काढून टाकणार आहे .

अशा परिस्थितीत दमाणी नगर, इंद्रधनु, देगाव, मंगळवेढा, सांगोला, सांगली मार्गे कोल्हापूर आणि पुढे जाणाऱ्या वाहनांची प्रचंड गैरसोय होणार होती, त्याला पर्याय म्हणून छत्रपती धर्मवीर संभाजी राजे चौक, जुना पुणे नाका, अवंती नगर, अरविंद धाम ते देशमुख पाटील वस्ती, देगाव सीएनएस हॉस्पिटल, आणि पुढे सोरेगाव पर्यंतचा नवीन प्रस्तावित 54 मीटर बायपास रस्ता गेली अनेक वर्षे पेंडिंग आहे.

रेल्वे पुलाचे कधीही पाडकाम केले जाऊ शकते, यासाठी सोलापूर विकास मंच गेले तीन वर्षे सातत्याने हा बायपास 54 मीटर रस्ता तातडीने पूर्ण करावा यासाठी मनपा आयुक्त, अतिरिक्त आयुक्त, उपायुक्त, शहर अभियंता व रेल्वे अधिकारी, डी आर एम साहेब यांच्याशी सातत्याने अनेक बैठका घेतल्या. अनेक पालकमंत्री होऊन गेले, त्या प्रत्येकासमोर हा विषय सोलापूर विकास मंच मांडतच होता.

विद्यमान पालकमंत्री चंद्रकांत दादा पाटील यांच्याकडे तीन वेळा हा विषय सोलापूर विकास मंचच्या पदाधिकाऱ्यांनी समक्ष भेटून त्याचे महत्त्व पटवून दिले.

जुना पुणे नाका, अरविंद धाम, देशमुख पाटील वस्ती ते देगाव सीएनएस हॉस्पिटल पर्यंत हा निम्मा भाग पूर्ण होण्यासाठी महानगरपालिकेला तीन कोटी रुपयांची गरज होती. त्यासाठी सोलापूर विकास मंचने विविध पातळीवर, मंत्रालय पातळीवर अनेक प्रयत्न करून पैशाची मागणी केली.

आत्ताच अधिकृत सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार राज्य शासनाने या 54 मीटर रस्त्यासाठी चार कोटी बारा लाख रुपये मंजूर केलेले आहेत.

रेल्वेचा पूल पाडे पर्यंत किमान निम्मा रस्ता तरी पूर्ण होईल अशी आशा करूयात. सोलापूर विकास मंचच्या प्रयत्नंना मिळालेले हे फार मोठे यश मानावे लागेल.

इतक्या वर्षात एकाही आमदार, खासदार, नगरसेवक यांना सदरच्या रस्त्याचे महत्त्व पटले नव्हते. आज सुद्धा कुणीही या रस्त्याच्या बाबतीत आग्रही नाही ही खेदाची बाब म्हणावी लागेल.

सोलापूर विकास मंच ने मात्र हा विषय सातत्याने लावून धरून तडीस नेलेला आहे.

सोलापूरकरांची वाहतूक कोंडीतून काही प्रमाणात सुटका होईल अशी अशा व्यक्त करूयात.

विद्यमान सरकारने जाताजाता सोलापूरचे महत्त्वाचे काम केल्याबद्दल पालकमंत्री महोदयांचे आभार तसेच या प्रदीर्घ मोहिमेचे श्रेय सोलापूर विकास मंच चे मिलिंद भोसले, योगीन गुर्जर, केतन शहा, विजय जाधव, दत्तात्रेय अंबुरे, सुहास भोसले, मनोज क्षीरसागर, आंनद पाटील, या सर्व मंडळी व सोलापूर विकास मंच च्या सदस्यांना जाते.

# उपमुख्यमंत्री अजित दादा पवार यांनी युवती अध्यक्ष किरण माशाळकर व युवक अध्यक्ष सुहास कदम यांचा कामाचा केला कौतुक

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** राष्ट्रवादी युवती काँग्रेस पार्टी व युवक काँग्रेस पार्टीच्या वतीने सोलापूर शहरात सहा कॉलेज मध्ये युवक युवती संवाद कार्यक्रम राष्ट्रवादी युवती अध्यक्ष किरण माशाळकर व युवक अध्यक्ष सुहास कदम यांनी आयोजित केला होता. उपमुख्यमंत्री अजित दादा पवार यांनी सोलापूर दौऱ्यावर आल्यानंतर विश्रामगृह येथे युवक युवती संवाद च्या कार्यक्रमाबद्दल



अजित दादांना कार्य अहवाल दाखवल्यानंतर राष्ट्रवादी युवती अध्यक्ष किरण माशाळकर व युवक अध्यक्ष सुहास कदम यांचे कामाचे कौतुक उपमुख्यमंत्री अजित दादा पवार यांनी केले आणि पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. सोलापूर शहरात युवक युवती असंच काम करत राहा असं अजित दादा यांनी किरण माशाळकर व सुहास कदम यांना म्हणाले.

# टेंभुर्णी पोलिस स्टेशन येथे कोटामार्फत फिरते लोक न्यायालय 11केसेस 3600 दंड वसूल

**टेंभुर्णी (कटूसत्य वृत्त):-** टेंभुर्णी पोलीस ठाणे येथे माननीय प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी माढा यांचे कोर्टा मार्फत महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरण मुंबई यांचे फिरते लोक न्यायालय टेंभुर्णी पोलीस स्टेशन येथे आयोजित केले होते. यावेळी 11 केसेसचे 3600 रू.दंड झाला.



या फिरते न्यायालयात भारतीय दंड संहिता कलम 283 च्या 4 केसेस मधील चार आरोपी यांना प्रत्येकी 200 रुपये दंड, भारतीय दंड संहिता 279, 236 चे 1 केस मधील एका आरोपीस 1000 रुपये दंड, मुंबई जुगार कायदा 12/अ प्रमाणे 6 केसेस मधील सहा आरोपी यांना प्रत्येकी 300 रुपये दंड असे एकूण 11 केसेस 3600 रुपये दंड झाला आहे.

टेंभुर्णी पोलीस ठाणे येथील फिरते न्यायालयामध्ये माढा कोर्टाचे न्यायाधीश एसजी.लठूरिया, माढा बार वकील संघटनेचे अध्यक्ष एस. एन.धोत्रे, पो.नि दीपक पाटील, ए.एस.आय शिंदे हजर होते.

# ज्ञानराई वनउद्यान ऑक्सीजन पार्क निर्मिती प्रकल्पास मान्यता

**आळंदी (कटूसत्य वृत्त):-** खेड तालुक्याचे स्व.आमदार सुरेशभाऊ गोरे यांचे खेड तालुक्याचे शाश्वत व पर्यटन विकासाचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी चाकण-आळंदी मार्गावर ज्ञानराई वनउद्यान ऑक्सीजन पार्क निर्मिती प्रकल्प विकसित होणार आहे. या प्रकल्पाचे अहवालास अंतिम मान्यता स प्रकल्पास महाराष्ट्र निसर्ग पर्यटन विकास मंडळ, नागपूर यांचे कडून मिळाली आहे. अशी माहिती महाराष्ट्र राज्य प्रदूषण नियंत्रण मंडळ सदस्य नितिन गोरे यांनी दिली आहे.



आळंदी चाकण रस्त्यावर वन विभागाची मोठी जागा आहे. या वन विभागाच्या जमिनीवर ऑक्सीजन पार्कची निर्मिती करण्याचा प्रस्ताव देऊन महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचे सदस्य नितिन गोरे यांनी मागणी केली होती. यासाठी महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, वनमंत्री सुधीर मुनगंटीवार यांच्याकडे मागणी करीत प्रस्ताव देऊन पाठपुरावा केला. या बाबत मुख्यमंत्री व वनमंत्री यांनी संबंधित विभागाला तात्काळ प्रस्ताव सादर करण्याचे आदेशही दिले होते. तसेच या मागणी बाबत महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचे अध्यक्ष सिद्धेश कदम यांच्या कडेही मागणी करुन वनविभाग व महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाची संयुक्त बैठक घेऊन हा प्रकल्प दोन्हीही विभागाकडून एकत्रित करण्याच्या दृष्टीने आवश्यक कार्यवाही करुन निधी व अन्य सर्व बाबींसाठी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने पुढाकार घेतला होता. सर्व संबंधीत दोन्ही विभागांमध्ये सकारात्मक बैठका होऊन याबाबतच्या प्रकल्प अहवालास महाराष्ट्र निसर्ग पर्यटन विकास मंडळ, नागपूर यांच्याकडून अंतिम मंजुरी मिळाली आहे. यामुळे आळंदी चाकण मार्गावर ज्ञानराई वनउद्यान या नावाने प्रकल्प विकसित होत आहे. लवकरच प्रत्यक्ष कामास सुरुवात होणार आहे.

यामध्ये गवता पासून तयार केलेली उद्याने, वृद्धांसाठी नाना-नानीपार्क, तरुणांसाठी फिटनेस पार्क, चिल्ड्रेन पार्क, योगापार्क, पक्षी निरीक्षण केंद्र इत्यादींचा समवेश असणार आहे. यामुळे चाकण व आळंदी परिसरातील नागरिकांना तसेच आळंदी तीर्थक्षेत्र येथे येणाऱ्या लाखो भाविकांसह चाकण औद्योगिक वसाहतीत काम करणाऱ्या कामगारांना त्यांच्या आरोग्याच्या दृष्टीने मोठ्या प्रमाणावर उपयोग होईल. प्रकल्पाच्या माध्यमातून खेड तालुक्याच्या पर्यटना सोबतच पर्यावरण जनजागृती व संरक्षण यावर भर पडणार आहे. या दृष्टीने हा प्रकल्प महत्त्वाकांक्षी ठरणार आहे. तसेच या प्रकल्पामुळे स्थानिक लोकांना रोजगार मिळण्यास मदत होणार असल्याचे नितीन गोरे यांनी सांगितले.

## वात्रटिका

### त्यागाचे गणित

कोणी किती केला त्याग
तुम्ही आम्ही पाहिला...
पक्ष फुटला घरही फुटले
नात्यात कडवटपणा आला...
राजकारणाच्या पत्रावळीवर
लाडू ऐवजी सांडगा आहे...
काम साधवून घेतले की
जो तो लबाड लांडगा आहे...

**हणमंत पडवळ,**
धाराशिव,
8698067566

हे दैनिक मालक-प्रकाशक, मुद्रक, संपादकः श्री पांडूरंग हरिदास सुरवसे यांनी संस्कृती प्रिंटींग प्रेस, एफ-3, वृंदावन पार्क, होटगी रोड, सोलापूर - 413003 येथे छापून येथूनच प्रसिद्ध केले. कार्यालयः एफ - 3, वृंदावन पार्क, होटगी रोड, सोलापूर - 413003
फोन/फॅक्स (0217)2605091 RNI No . MAHMAR 2006/17624 संपादकः पांडूरंग हरिदास सुरवसे, मो. (9765390339) उपसंपादकः सचिन मोहन जाधव, मो. (9657069069) कायदा सल्लागारः ॲड खतीब वकील.
Owner, Publisher, Printer and Editor Pandurang Haridas Survase Printing at Sanskruti Printing Press F-3 Vrundavan Park, Hotagi Road, Solapur 413003. (Maharashtra) Published from Office F-3 Vrundavan Park, Hotagi Road, Solapur 413003.(Maharashtra) Phone-0217-2605091 Editor Pandurang Survase-9765390339, Deputy Editor Sachin Jadhav-9657069069. **RNI No. MAHMAR 2006/17624**

# कार्तिक यात्रा कालावधीत भाविकांची गैरसोय होणार नाही याची दक्षता घ्यावी : प्रांताधिकारी - इथापे

**पंढरपूर (कटूसत्य वृत्त):-** कार्तिकी यात्रा कालावधीत श्री विठ्ठल रुक्मिणी मातेच्या दर्शनासाठी राज्यातील विविध जिल्ह्यातून तसेच परराज्यातून मोठ्या प्रमाणात भाविक येतात. दिनांक 12 नोव्हेंबर 2024 रोजी कार्तिकी एकादशी असून यात्रेचा कालावधी दि. 02 ते 15 नोव्हेंबर 2024 आहे. यात्रा कालावधीत 65 एकर (भक्ती सागर) येथे मोठ्या प्रमाणावर भाविकांची गर्दी 65 एकर (भक्ती सागर) येथे शेगांवदुमाला ते जुना दगडी पुल या ठिकाणी कोणतेही अतिक्रमण होणार नाही याची दक्षता घेवून गर्दीचे व्यवस्थापनाबाबत सूक्ष्म नियोजन करावे.तसेच यात्रेत येणाऱ्या भाविकांची कोणतेही गैरसोय होणार नाही याची दक्षता सर्व संबधित विभागाने घ्यावी अशा, सूचना प्रांताधिकारी सचिन इथापे यांनी दिल्या.

कार्तिकी यात्रा कालावधीत भाविकांच्या सोयी-सुविधासाठी प्रशासनाकडून करण्यात येणाऱ्या नियोजनाबाबत प्रांत कार्यालय, पंढरपूर येथे बैठक घेण्यात आली. बैठकीस उपविभागीय पोलीस अधिकारी डॉ.अर्जुन भोसले, तहसिलदार सचिन लंगुटे, गटविकास अधिकारी सुशिल संसारे, कार्यकारी अभियंता अमित निंबकर, पोलीस निरिक्षक विश्वजीत घोडके, मंदीर समितीचे व्यवस्थापक मनोज श्रोत्री तसेच संबधित विभागाचे अधिकारी उपस्थित होते.



यावेळी बोलताना प्रांताधिकारी इथापे म्हणाले, यात्रा कालावधीत भाविकांच्या सुविधेबाबत नगर पालिका व मंदिर प्रशासनाची महत्वाची जबाबदारी आहे.या कालावधीत नगरपालिकेने स्वच्छ पिण्याच्या पाण्याचा मुबलक पाणी पुरवठा करावा, वाळवंटातील तसेच शहरातील अतिक्रमणे तात्काळ काढावीत.वाळवंटात पुरेशा प्रकाश राहिल याबाबत नियोजन करावे,धोकादायक इमारतींवर ठळक सूचना फलक लावावेत. अनाधिकृत फलक काढावेत.मोकाट जनावरांचा बंदोबस्त करावा. मंदीर समितीने व नगरपालिकेने प्रदक्षिणा मार्ग, नदीपात्रात आवश्यक ठिकाणी बॅरकेंटींग करावे व अग्निशामक यंत्रणा कार्यरत ठेवावी .कार्तिकी यात्रा कालावधीत मंदीर समितीने जादाचे पत्राशेड उभारावेत, दर्शन रांगेत ठिकठिकाणी सूचना फलक लावावेत. मंदीरात तसेच मंदीराभोवती करण्यात येणाऱ्या विद्युत रोषणाईचे फायर ऑडीट व स्काय वॉकचे स्ट्रॅक्चरल ऑडीट करुन घ्यावे.

तसेच कार्तिक यात्रा कालावधीत वाखरी येथे जनावरांचा बाजार मोठ्या प्रमाणावर भरत असल्याने पशुसंवर्धन विभागाने पशुवैद्यकीय पथकांची नेमणूक करावी. तसेच संबधित विभागाने जनावरांच्या व पशुपालकांच्या पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करावी. अन्न व औषध प्रशासनाने शहर व परिसरातील खाद्य पदार्थाच्या दुकानांची तपासणी करावी. एस.टी महामंडळाने प्रवाशी वाहतुकीचे नियोजन करुन बसस्थानकावर आवश्यक सुविधा उपलब्ध कराव्यात अशा सूचनाही प्रांताधिकारी इथापे यांनी दिल्या.

यावेळी उपविभागीय पोलीस अधिकारी डॉ.भोसले म्हणाले, यात्रा कालावधीत वाहतुक व्यवस्था सुरळीत रहावी तसेच भाविकांना सुरक्षेबाबत कोणतेही अडचण येऊ नये यासाठी पोलीस प्रशासनाने आवश्यक नियोजन केले आहे. नगरपालिकेने शहरातील पार्कीग ठिकाणची लेव्हलिंग करुन झाडे-झुडपे काढावेत तसेच प्रकाश व्यवस्था करावी.मंदीर व मंदीर परिसरात फिरत्या विक्रेत्यांमुळे मोठ्या प्रमाणात भाविकांना त्रास होतो यासाठी जादा हॉकर्स पथकाची नेमणूक करावी अशा सूचना त्यांनी यावेळी दिल्या.

यावेळी मंदिर समितीचे व्यवस्थापक श्री. श्रोत्री म्हणाले, कार्तिकी यात्रा कालावधीत भाविकांना जलद व सुखकर दर्शन व्हावे यासाठी मंदिर समितीकडून योग्य नियोजन करण्यात आले असून, दर्शन रांगेत घुसखोरी होऊ नये यासाठी जादा सुरक्षा रक्षकांची नेमणूक करण्यात आली आहे. दि. 04 नोव्हेंबर रोजी श्रींचा पलंग काढून प्रक्षाळपुजेपर्यंत म्हणजे दि. 04 ते 20 नोव्हेंबर दरम्यान 24 तास श्रींचे दर्शन उपलब्ध करून देण्यात येणार आहे. या कालावधीत पत्राशेड येथे पूर्णवेळ अन्नछत्र सुरू ठेवण्यात येणार आहे. दर्शन रांगेतील भाविकांना स्वच्छ पिण्याच्या पाण्याची व्यवस्था व आवश्यक सोई सुविधा उपलब्ध उपलब्ध करण्यात येणार असल्याचे सांगितले.

यात्रा कालावधीत येणाऱ्या भाविकांना स्वच्छ पिण्याचे पाणी मिळावे यासाठी बोअरवेल, हातपंपाची पाणी तपासणी करण्यात येत आहे. पावसामुळे शहरात पडलेले खड्डे बुजविण्याचे काम सुरु असून, स्वच्छतेसाठी जादा हंगामी स्वच्छता कर्मचाऱ्यांची नेमणूक करण्यात येणार असल्याचे उपमुख्याधिकारी सुनिल वाळूजकर यांनी सांगितले.

# विद्यार्थ्यांत ज्ञानाऐवजी स्पर्धेची भावना चुकीची



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** ब्रिटिशांनी प्राचीन ज्ञान व ज्ञानदान पद्धतीवर आघात करून नवी शिक्षण पद्धती आणली. त्यामुळे विद्यार्थ्यांमध्ये ज्ञानाऐवजी स्पर्धेची भावना जास्त रुजत आहे, जे की चुकीचे आहे, असे मत ज्येष्ठ शिक्षणतज्ज्ञ ॲड. मिहिर प्रभूदेसाई यांनी येथे व्यक्त केले.येथील सुरवसे शिक्षण संकुलात समाजसेवक दत्तुअण्णा सुरवसे अमृतमहोत्सवानिमित्त व्याख्यानमालेत ते आधुनिक शिक्षणपद्धती व शिक्षकांचे योगदान या विषयावर पुष्प गुंफताना ते बोलत होते.

प्रभूदेसाई म्हणाले, शिक्षकांनी केलेल्या भरीव योगदानामुळेच भारताची आजची पिढी समृद्ध झाली आहे. प्रलय और निर्माण शिक्षक की गोद में खिलते है हे कवींनी मांडलेले मत सत्य आहे. सध्याच्या काळातील शिक्षणाचे बाजारीकरण ही विद्यार्थी घडवण्याची चुकीची पद्धत बदलण्याची गरज त्यांनी व्यक्त केली. यावेळी दत्ताअण्णा सुरवसे व प्रभा सुरवसे या दांपत्याचा सत्कार संस्थेच्या वतीने करण्यात आला. तसेच यावेळी मानवता विकास मंडळ, महाराष्ट्र साहित्य परिषद शाखा आदी संस्थांच्या वतीने त्यांचा सत्कार झाला.दत्ता अण्णा सुरवसे यांच्यासारखे दानशूर व्यक्तिमत्व समाजासाठी देवदूतच आहेत असे प्रतिपादन नरेंद्र काटीकर यांनी केले. या कार्यक्रमास राजकुमार सुरवसे, मनीष सुरवसे, राखी सुरवसे, वैशाली सुरवसे, विजय सुरवसे, श्वेता सुरवसे, रवींद्र नाशिककर, डॉ. नासीमा पठाण, हेमा चिंचोळकर, डॉ. श्रीकांत येळेगावकर पी.पी. कुलकर्णी, पद्माकर कुलकर्णी, मुख्याध्यापक संघाचे अध्यक्ष तानाजी माने, शिक्षण विस्तार अधिकारी बापूसाहेब जमादार यांच्यासह शिक्षण क्षेत्रातील गणमान्यांची उपस्थिती होती. प्राचार्या उज्वला साळुंखे यांनी प्रास्ताविक केले.

# सोलापूर लोकसभा मतदारसंघातील सहा जागांवर विजय मिळावा : काँग्रेसच्या निरीक्षक कृष्णा तीरथ



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** सोलापूर लोकसभा मतदारसंघात समाविष्ट सर्व सहा विधानसभा मतदारसंघ जिंकण्यासाठी काँग्रेसचे पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी कामाला लागावे, असे आवाहन माजी केंद्रीय राज्यमंत्री तथा काँग्रेसच्या निरीक्षक कृष्णा तीरथ यांनी केले.वुधवारी, अखिल भारतीय काँग्रेस कमिटीने महाराष्ट्र विधानसभा निवडणूक संघटनात्मक कामकाजासाठी तीरथ यांची निरीक्षक तर समन्वयकपदी ॲड.केशव इंगळे यांची नियुक्ती केली आहे. तीरथ यांनी काँग्रेस भवन येथे पदाधिकारी व कार्यकर्त्यांशी संवाद साधला. त्यावेळी त्यांनी हे आवाहन केले. शहर अध्यक्ष चेतन नरोटे,जिल्हा कार्याध्यक्ष ॲड. नंदकुमार पवार यांनी वैठकीचे आयोजन केले होते.यावेळी तीरथ यांनी, सोलापूर लोकसभा मतदारसंघातील वूथ कमिटी, प्रभागनिहाय कामकाज,पोलिंग बूथ, काँग्रेस, महाविकास आघाडी व मित्रपक्षांच्या उमेदवारांचा प्रचार, ब्लॉकनिहाय कामकाज, ग्रामीण व शहरात वूथनिहाय वूथ लेवल एजंट यांचे ट्रेनिंग यावावत मार्गदर्शन केले.माजी केंद्रीय गृहमंत्री सुशीलकुमार शिंदे, खा. प्रणिती शिंदे यांच्या नेतृत्वाखाली काँग्रेसने आजपर्यंत केलेले कामकाज निवडणुकीच्या माध्यमातून जनतेसमोर मांडून माने, वाळासाहेव शेळके, जिल्हा कार्याध्यक्ष सुरेश हसापुरे, वावा मिस्त्री, संजय हेमरेड्डी, उदयशंकर चाकोते, रियाज हुंडेकरी, आरिफ शेख, शिवा वाटलीवाला, आरिफ शेख, अलका राठोड, देवेंद्र भंडारे,नरसिंग कोळी, अंबादास करगुळे, महाविकास आघाडीचे उमेदवार गणेश डोंगरे, फिरदौस पटेल, नेते,निवडून आणण्याविपयी नेते,पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी प्रयत्न करावे असे आवाहन त्यांनी केले. या बैठकीस माजी मंत्री सिद्धाराम म्हेत्रे,माजी आ.दिलीप माने,हरीश पाटील, सुलेमान तांबोळी,शालिवाहन माने-देशमुख, प्रमिला तुपलवंडे, अशोक देवकते, शौकत पठाण, सुभाप चव्हाण, भीमाशंकर जमादार आदी उपस्थित होते.

# सोलापूरात एमआयएम चार जागा लढवणार - जिल्हाध्यक्ष फारुक शाब्दी

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** एमआयएम पक्षाकडून सोलापूर जिल्ह्यात एकूण चार विधानसभा मतदारसंघात उमेदवार उभे करणार असून यामध्ये शहर मध्य अक्कलकोट, सोलापूर दक्षिण, सोलापूर उत्तर विधानसभा मतदारसंघाचा समावेश असल्याचे पक्षाचे शहर व जिल्हाध्यक्ष फारुक शाब्दी यांनी बुधवारी पत्रकार परिषदेत सांगितले. महाराष्ट्रामध्ये सर्वात प्रथम शाब्दी यांची सोलापूर शहर मध्यमधून उमेदवारी जाहीर करण्यात आली होती. यंदाची विधानसभा निवडणूक संपूर्ण ताकदीने आपण लढवणार आहोत. निवडून आल्यानंतर सरकारकडून मिळणाऱ्या आमदारकीच्या वेतनातून एक



रुपयाही स्वतः न वापरता त्यातून समाजकार्य करणार आहे.तसेच स्वतःकडील सुमारे एक कोटी रुपये बचत गटासाठी अर्थसहाय करणार आहे.दररोज १००० महिलांना रोजगार मिळतील, असा उद्योग सोलापुरात सुरू करणार असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले. तीन विधानसभा मतदारसंघात उमेदवार उभे करणार असल्याचे सांगितले. मात्र, त्यांनी उमेदवार जाहीर केले नाहीत. लवकरच पक्षाकडून जाहीर करण्यात येणार असल्याचेही त्यांनी सांगितले. फारूक शाब्दी यांनी २०१९ ची विधानसभा निवडणूक लढवली होती.

त्यावेळेस सुमारे ३९ हजार मते त्यांनी घेतली होती.लोकसभा निवडणुकीत मुस्लीम समाजाच्या भावनांचा विचार करत एमआयएम पक्षाने उमेदवार न दिल्याचेही त्यांनी सांगितले. मागच्या वेळी आपण मतदारसंघात नवीन होतो.तयारीसाठी मला वेळ मिळाला नव्हता. यंदा मात्र, आपण तयारीनिशी विधानसभेच्या रिंगणात उतरल्याचे त्यांनी सांगितले.

# इच्छा भगवंताची परिवाराच्या वतीनं देवी भक्तांना छत्री, नॅपकिन आणि महाप्रसादाचे वाटप

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** कोजागिरी पौर्णिमा निमित्त महाराष्ट्राची कुलस्वामिनी आई तुळजाभवानीच्या दर्शनासाठी सोलापूर तुळजापूर मार्गावरून लाखो भाविक अनवाणी पायी चालत तुळजापूरच्या दिशेने मुखी आई राजा उदो उदो सदानंदीचा उदो भवानी माते की जयचा जयघोष करीत रवाना होत असतात. दरम्यान गेल्या पंचवीस वर्षापासून इच्छा भगवंताची मित्र परिवाराचे संस्थापक लक्ष्मण मामा जाधव यांच्या मार्गदर्शनाने सोलापूर तुळजापूर मार्गावरील गणपती घाट येथे महाप्रसादाचा वाटप करण्यात येतो यंदाच्या वर्षी दिवसभर ऊन आणि रात्री पावसाचे वातावरण असल्याने भक्तांची गैरसोय होऊ नये या हेतूने लक्ष्मण मामा जाधव यांच्या मार्गदर्शनाने राष्ट्रवादी काँग्रेस पाटीर्चे प्रदेश उपाध्यक्ष तथा



जिल्हा नियोजन समितीचे विशेष निमंत्रित सदस्य किसन जाधव, कार्यसम्राट नगरसेवक नागेश गायकवाड, मार्गदर्शक अनिल जाधव, यांच्या नेतृत्वाखाली इच्छा भगवंताची मित्र परिवाराच्या वतीने तुळजापूरला पायी चालत जाणाऱ्या भक्तांना छत्री नॅपकिन आणि महाप्रसादाचे वाटप करण्यात आले. शारदीय नवरात्र महोत्सवात इच्छा भगवंताची मित्रपरिवार नवरात्र महोत्सव मंडळाच्या शक्ती देवीची जागर मोठ्या भक्ती भावाने व अमाप उत्साही वातावरणात साजरा होत असतो तसेच गेले पंचवीस वर्षापासून तुळजापूरला पायी चालत जाणाऱ्या भक्तांसाठी अखंडित सेवा आज तागायत सुरू असल्याचे मंडळाचे सर्वेसर्वा, मार्गदर्शक लक्ष्मण मामा जाधव यांनी यावेळी सांगितले. प्रतिवर्षाप्रमाणे यंदाच्या वर्षी देखील देवी भक्तांमध्ये उत्साहाचा वातावरण असून भक्तांची गैरसोय होऊ नये या दृष्टीने इच्छा भगवंताची परिवाराने यंदाच्या वर्षी अभिनव उपक्रम राबविले असल्याचे राष्ट्रवादी प्रदेश उपाध्यक्ष किसन जाधव म्हणाले.

यावेळी लक्ष्मण मामा जाधव यांच्या उपस्थितीत देवी भक्तांना छत्री नॅपकिन आणि महाप्रसादाचे वाटप करण्यात आले. याप्रसंगी राष्ट्रवादी शहराध्यक्ष संतोष पवार, ज्येष्ठ नेते हेमंत चौधरी, महेश निकंबे, राष्ट्रवादी युवक प्रदेश सरचिटणीस चेतन गायकवाड, महिला शहराध्यक्ष संगीताताई जोगदनकर, युवती अध्यक्षा किरण माशाळकर, शिवाजी गायकवाड, अंबादास गायकवाड, मोहन जाधव, अंबादास जाधव, किरण मोहन मामा चव्हाण, सत्तार सय्यद,उमेश जाधव,अमोल सरवाळे, सतीश लोंढे, श्रीगणेश लाडू, निलेश कांबळे, संतोष गायकवाड, हरीश तेलगू, निलेश कांबळे, शरद शिंदे, सचिन गुत्तेदार, अरविंद शेरखान निकम, पंडित शेटे, सागर कांबळे, सचिन पिसे, अमोल लकडे, शिवा बंडगर, शिवाजी जाधव, मारुती अकलूजकर, बार्शीकर दादा, दीपक नंदुरकर, राहुल जाधव, सचिन जाधव, विनोद जाधव, पवन गायकवाड, कार्तिक जाधव, अजिंक्य जाधव, गजू शिंदे, कमलेश सातपुते, अमोल जगताप, किरण शिंदे, दिनेश आवटे,सोनू पटेल, सचिन जाधव,आकाश जाधव, जयेश जाधव, प्रथमेश पवार, ऋषी येवले, महादेव राठोड, वसंत कांबळे, माणिक कांबळे, उमेश जाधव, अमोल जगताप, किरण शिंदे, दशरथ शेडगे, प्रकाश जाधव, सोमनाथ शिंदे, हुलगप्पा शासम, अमन शिंगे, श्रेयस उकरांडे, दर्शन बिराजदार, सुजल कटारे आदींसह इच्छा भगवंताची मित्रपरिवाराचे पदाधिकारी सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# मुद्रांक शुल्कावर ५०० रुपये; अंमलबजावणी १६ ऑक्टोबरपासून सुरू

**मुंबई (कटूसत्य वृत्त):-** वाढत्या महागाईने सर्वसामान्यांचे कंबरडे मोडले असतानाच आता राज्य सरकारने आणखी एक झटका दिला आहे. यापुढे १०० आणि २०० रुपयांच्या मुद्रांक शुल्कावर ५०० रुपये लागणार आहेत. त्याची अंमलबजावणी १६ ऑक्टोबरपासून सुरू झाली आहे.महाराष्ट्र मुद्रांक कायद्यात सुधारणा करण्याचा अध्यादेश राज्यपालांनी सोमवारी जारी केला होता. या अध्यादेशाची अंमलबजावणी आजपासून सुरू आहे. यापूर्वी मुद्रांक शुल्कासाठी १०० आणि २०० रुपये द्यावे लागत होते. मात्र यावर बंदी घातल्यापासून सर्व व्यवहार केवळ ५०० रुपयांच्या स्टॅम्पवरच करावे



लागणार आहेत. त्यामुळे खत खरेदी आणि हक्क सोडण्यासाठी सुद्धा ५०० रुपये मुद्रांक शुल्क भरावे लागणार आहे.महाविकास आघाडी सरकारने महाराष्ट्र मुद्रांक अधिनियम, १९९८ मध्ये सुधारणा करून प्रतिज्ञापत्र, करार आणि संबंधित कागदपत्रांवरील मुद्रांक शुल्क ५०० रुपये करण्याचा निर्णय घेतला आहे. महाराष्ट्र मुद्रांक कायद्यातील सुधारणांमुळे राज्याला मुद्रांक शुल्क आणि नोंदणीतून सुमारे २ हजार कोटी रुपयांचा महसूल वाढण्यास मदत होईल. कारण मुद्रांक शुल्क हा राज्य सरकारच्या महसुलाचा एक महत्त्वाचा स्रोत आहे, असे महसूल विभागाचे म्हणणे आहे.याआधी, खरेदी कराराची नोंदणी, हक्क सोडणे, डीड नोंदणी किंवा सदनिकांच्या विक्री व्यवहारासाठी १०० रुपये मुद्रांक शुल्क भरावे लागत होते. मात्र, आता राज्य सरकारने मुद्रांक शुल्कात वाढ करण्याचा निर्णय घेतला आहे.त्यामुळे मुद्रांक शुल्काच्या किमतीत वाढ झाली आहे. त्यामुळे कोणत्याही व्यवहारासाठी ५०० रुपये मुद्रांक शुल्क भरावे लागणार आहे.नोटरीसाठी किंवा बँकेकडून कर्ज घेण्यासाठीही ५०० रुपये मोजावे लागणार आहेत.

# मोहोळ मतदारसंघ शिवसेना ठाकरे गटाला सुटण्याचे भाकीत

## ताकतीने लढून मतदारसंघ जिंकून दाखवू : तालुकाप्रमुख अशोक भोसले

**कुरुल (कटूसत्य वृत्त):-** विधानसभा निवडणुकांचे रणशिंग फुंकले असून महाविकास आघाडी आणि महायुतीचा जागा वाटपाचा फॉर्मुला देखील चार दोन दिवसात स्पष्ट होणार आहे. याच अनुषंगाने मोहोळ मतदारसंघातील जनतेचे लक्ष आपली जागा महाविकास आघाडीच्या कोट्यातून कोणत्या पक्षाला सुटणार याकडे लागले असताना मोहोळ मतदार संघ शिवसेना ठाकरे गटाला सुटणार असल्याचे भाकीत शिवसेना ठाकरे गटाचे तालुकाप्रमुख अशोक भोसले यांनी वर्तविले असून हा मतदार संघ ताकतीने लढून यंदा कसल्याही परिस्थितीत आमदार शिवसेनेचाच असेल असा विश्वास पत्रकार परिषदेत बोलून दाखविला.

या पत्रकार परिषदेत बोलताना पुढे ते म्हणाले की, युती आणि आघाडी असताना मोहोळ मतदार संघामध्ये राष्ट्रवादी व शिवसेना या दोन्ही पक्षात काटे की टक्कर होत होती. अवघ्या काही हजारांवर नेहमीच शिवसेनेचा पराभव झालेला आहे. मात्र पुढे महायुती आणि महाविकास आघाडी जन्म झाल्यानंतर विद्यमान आमदार असलेल्या महायुतीची जागा राष्ट्रवादी अजित पवार गटाला जाते. मात्र या जागेवर महाविकास आघाडी कडून प्रामुख्याने शिवसेना ठाकरे गटाचा दावा असल्याचे त्यांनी सांगितले. मोहोळ मतदार संघात शिवसेना आणि शिवसैनिकांनी मोठे बलिदान दिले आहे. अनेक वेळा राजकारणासाठी आणि भगव्यासाठी रक्तरंजित इतिहास देखील घडला आहे.

सध्या मोहोळ मतदार संघात राष्ट्रवादी शरद पवार गटाची ताकद नगण्यच आहे हे मान्य करावे लागेल. जरी विद्यमान आमदार राष्ट्रवादीचा असला तरी राष्ट्रवादीच्या फुटी नंतर बलाढ्य ताकद अजित पवार गटात गेली आहे. त्यामुळे शरद पवार गटाची ताकद कमकुवत आहे ही वस्तुस्थिती आम्ही वरिष्ठांच्या कानावर घातली असून याबाबत लवकरच निर्णय होणार असल्याचे त्यांनी सांगितले. शिवाय मोहोळ तालुक्यात शिवसेना ठाकरे गटाची ताकद मोठ्या संख्येने आहे. तालुक्यातील आणि मतदारसंघातील प्रत्येक गावात शिवसैनिक आणि शिवसेनेचा गट अभेद्य असल्याचे जिल्हाप्रमुख गणेश वानकर यांच्याशी चर्चा करून मातोश्रीवर हा अहवाल दिला असल्याचे पत्रकारांशी बोलताना सांगितले.

### अनगर अपर तहसील कार्यालयाचा आमच्यासाठी प्लस पॉइंट

- मोहोळ तहसील कार्यालयाचे विभाजन करून जवळपास 30 गावांना गैरसोयीचे असलेले अनगर अपर तहसील कार्यालय हा मुद्दा सध्या प्रकर्षणाने चर्चेत आहे. शिवाय महायुतीतील पक्षांबद्दल असलेली नाराजी याचा मोठा फायदा शिवसेना ठाकरे गटाला होऊ शकतो. त्यामुळे मोहोळ मतदार संघ मशालीला सुटावा यासाठी संपर्कप्रमुख अनिल कोकीळ, जिल्हाप्रमुख गणेश वानकर यांच्या मार्गदर्शनाखाली प्रयत्न सुरू आहे.

अशोक भोसले, तालुकाप्रमुख शिवसेना ठाकरे गट

# फक्त पैसा व मनोरंजनाच्या जोरावर आमदार होता येते हा विरोधकांचा गैरसमज - आ. बबनदादा शिंदे

## वडाचीवाडी (अं.उ) येथे शेतकरी मेळावा व वचनपूर्ती सोहळा संपन्न

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** मागील 30 ते 35 वर्षापासून सातत्याने जनतेचे व शेतकऱ्यांचे प्रश्न मनापासून सोडविले आहेत. मतदारसंघात जलसिंचन,वीज, साखर कारखाने, रस्ते व विविध सामाजिक उपक्रमांसह केलेल्या विकासकामांमुळेच जनतेची क्रयशक्ती व राहणीमान उंचावले आहे ही वस्तुस्थिती असताना सध्या स्वतःला भावी आमदार म्हणून समजणारे काहीजण फक्त पैसा आणि मनोरंजनाच्या कार्यक्रमाच्या जोरावर आमदार होता येते असे समजत आहेत परंतु तो त्यांचा गैरसमज आहे.हे येत्या विधानसभा निवडणुकीत माढा मतदारसंघातील सुज्ञ व जागरूक मतदार नक्कीच दाखवून देतील असे प्रतिपादन आमदार बबनदादा शिंदे यांनी केले आहे.

ते वडाचीवाडी (अं.उ) ता.माढा येथे आयोजित कार्यकर्ता व शेतकरी मेळावा आणि वचनपूर्ती सोहळ्याच्या प्रसंगी बोलत होते.

प्रास्ताविकात लोकप्रिय सरपंच रमेश भोईटे यांनी गावांमध्ये केलेल्या विविध विकासकामांची व भविष्यात करावयाच्या कामांची माहिती सांगितली.

यावेळी आमदार बबनराव शिंदे यांचा गावासाठी कोट्यावधी रुपयांचा निधी दिल्याबद्दल सरपंच रमेश भोईटे व ग्रामपंचायत सदस्य आणि पाणी फाउंडेशन टीमच्या वतीने विशेष सत्कार करण्यात आला.

यावेळी बोलताना जिल्हा दूध संघाचे चेअरमन रणजितसिंह शिंदे म्हणाले की,आजपर्यंत या भागातील जनता व शेतकऱ्यांच्या बहुतांश मागण्या पूर्ण करून शाश्वत विकास केला आहे.बार्शी उपसासिंचन योजनेतून तालुक्यातील 4 गावांना पुढील रोटेशनला नक्कीच पाणी मिळणार आहे.सीना-माढा उपसा सिंचन योजनेच्या माध्यमातून तालुक्यातील गावोगावचे तलाव, शेततळी व बंधारे भरले आहेत त्यामुळे उन्हाळ्यातील पाण्याचा प्रश्न मिटला आहे. मतदारसंघातील विरोधकांचा कारभार व त्यांची सर्व कुंडली जनतेला माहित आहे. आजपर्यंत जनतेने विकासालाच मतदान केले आहे.सरपंच रमेश भोईटे यांच्या नेतृत्वाखाली व ग्रामस्थांच्या एकजुटीमुळे वडाचीवाडी हे गाव एक आदर्श कृषी पर्यटन केंद्र बनल्याचे गौरवोद्गार त्यांनी काढले आहेत.

1) यावेळी जिल्ह्यातील एकमेव आमदार बबनदादा शिंदे ऑक्सिजन पार्क, गुळपोळी ते वडाचीवाडी डांबरीकरण रस्त्याचे लोकार्पण, सभामंडप,साठवण तलावातील पाण्याचे पूजन आमदार बबनराव शिंदे यांच्या हस्ते व चेअरमन रणजितसिंह शिंदे यांच्या प्रमुख उपस्थितीत करण्यात आले.

2) या कार्यकर्ता व शेतकरी मेळाव्यात बोलताना आमदार बबनराव शिंदे म्हणाले की,जर मोठ्या साहेबांची तुतारी मिळाली तर ठीकच नाहीतर अपक्ष उमेदवार म्हणून माझा मुलगा रणजितसिंह शिंदे हे आगामी विधानसभा निवडणूक लढविणार आहेत. मतदारसंघातील विकासाचा रथ अविरत तेवत ठेवण्यासाठी माज्यापेक्षाही जास्त मताधिक्य देण्यासाठी मतदार संघातील जनतेने त्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे रहावे असे आवाहन त्यांनी केले.

यावेळी कृषी उत्पन्न बाजार समितीचे उपसभापती सुहास पाटील, खरेदी विक्री संघाचे अध्यक्ष तुकाराम ढवळे, विठ्ठलराव शिंदे कारखान्याचे संचालक अमोल चव्हाण,कृषी पर्यवेक्षक अनिलकाका देशमुख,माढेश्वरी बँकेचे गणेश काशीद,खरेदी विक्री संघाचे संचालक शिवाजी बारबोले, मदन आलदर, सरपंच



तानाजी लांडगे, सरपंच अशोक शिंदे, सरपंच राजेंद्र खोत,सरपंच रणजितसिंह पाटील, तात्यासाहेब भोईटे, मार्तंड जगताप, उपसरपंच आप्पासाहेब कोकरे, सुरवंताबाई गडदे, दिपाली जाधव, रंजना जगताप, विलास कौलगे, पंडित पाटील, कुमार शिंदे, तानाजी देशमुख, उल्हास राऊत, हनुमंत पाडूळे, रमेश उमाटे, शहानुर सय्यद, राजेंद्र गुंड, शिवाजी भोगे, रवींद्र चव्हाण, शरद नागटिळक, गणपत साठे, वैजिनाथ व्हळगळ, प्रविण लटके, तुकाराम कापसे, पिंटू नागटिळक, अमोल लटके, जाफर पटेल, पोपट काशीद, सचिन क्षीरसागर, सुधीर टोणगे पांडुरंग कौलगे, राजेंद्र सोमासे, रमेश कदम, दादाराव गडदे, बिपिन कदम, गणेश भोईटे, अनिल क्षीरसागर, ग्रामसेवक संजय क्षीरसागर, ग्रामसेविका रेश्मा पाटील, जयसिंग जगताप यांच्या ग्रामस्थ, शेतकरी व महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

सूत्रसंचालन करून आभार मिटू जगताप यांनी मानले.